**रे.दि.मू.नं. ३४/२०१५ मधील नि. ३३ खालील आदेश**
**( दत्तात्रय बोडरे विरूध्द लालजी पटेल )**
**(आदेश पारीत दि. ०७/१०/२०१७)**

नि. ३३ वरील प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी नं. १ यांनी त्यांचे विरूध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द होवून मिळणेकरिता दाखल केलेला आहे. सदर अर्जास वादीने म्हणणे दाखल केले आहे.

२. अर्ज, म्हणणे याचे अवलोकन केले. नि. ३३ मध्ये नमूद केलेली कारणे व त्यास वादीने दिलेले म्हणणे विचारात घेता वादी व प्रतिवादी यांचेमधील अंतिम वाद निकाली काढणेकरिता प्रतिवादी नं. १ विरूध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करणे व त्यांना दाव्यात सामील होणेस संधी देणे योग्य वाटते. सबब मी खालील आदेश पारीत करत आहे.

**आदेश**

१. नि. ३३ चा अर्ज मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादी नं. १ विरूध्द झालेला एकतर्फा आदेश रक्कम रूपये ७००/— चे कॉस्टवर रद्द करणेत येतो.

३. सदरची रक्कम प्रतिवादी नं. १ यांनी वादी यांना द्यावी.

४. सदर आदेशाची दोन्ही पक्षकारांनी नोंद घ्यावी.

**दि. ०७/१०/२०१७**

**(डी.एम.गिरी)**
**सह.दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,**
**खंडाळा.**